सत्र खटला क्र. १११/२०२४
सरकार – वि– विजय
<u>नि.क्र.</u> ३७

---

(आरोपीला हजर करण्या करिता https://meet.google.com/wvg-yndz-uxk ही लींक ई–मेल व्दारे अकोला कारागृहाचे अधिक्षक यांना पाठविण्यात आले. त्यानुसार आरोपीस व्ही.सी.व्दारे हजर करण्यात आले. सदर आरोपीच्या समक्ष साक्षीदाराचा पुरावा व्ही.सी.व्दारे नोंदविण्यात येत आहे. पुरावा नोंदवितांना चलचित्र स्पष्ट दिसत आहे तसेच आवाज स्पष्ट ऐकू येत आहे)

सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी.
मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नांव – नितीन प्रकाश कामेलु.
वय – ३४ वर्षे,
कामधंदा – हातमजूरी
राहणार – दुबे वाडी, खरप रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकार पक्षातर्फे सरतपास सरकारी विधीज्ञ श्री. एम.बी. मानकर यांच्यामार्फत</u>** –

१. मी आरोपीस ओळखतो. आरोपी हा आमच्या रेल्वे क्वार्टर नं. आरबीआय १०३ च्या मागे क्वार्टर नंबर आरबीआय १३५ए च्या बाजूला अतिक्रमण करुन टीनशेड मध्ये राहत होता. मृतक मनोज प्रकाश कामेलू हा माझा भाउ होता. आरोपी, सरताज शेख व माझा भाउ आधी मित्र होते. माझ्या भावास दारुचे व्यसन होते. माझा भाउ, आरोपी व सरताज शेख हे हॉटेल सिटी प्राईडच्या मागे रेल्वे स्टेशनच्या मागील घासलेट गोडावूनच्या ठिकाणी सोबत दारु प्यायचे.

२. माझ्या भावाचे सन् २००८ मध्ये आरोपी व त्याचे दोन भाउ नामे शिव रेड्डी व प्रकाश रेड्डी यांच्या सोबत भांडण झाले होते. आरोपीने रुपये ५०/– साठी माझ्या भावासोबत भांडण करुन त्याचे डोक्यात मारले होते. त्यामुळे माझ्या वडीलांनी आरोपी व त्याचे भावां विरुध्द पोलीस स्टेशन सिव्हील लाईन येथे रिपोर्ट दिला होता. त्यानंतर आम्ही एकाच मोहल्ल्यात राहत असल्यामुळे सदर वाद मिटविला होता. त्यानंतर माझ्या

भावा मध्ये व आरोपी मध्ये एकमेकांची कमी बोलचाल झाली होती.

३. माझा भाउ इले. फिटींगचे काम करीत होता. दिनांक ०७.११.२०२३ रोजी माझा भाउ व सरताज शेख इले. वायर फीटींगचे कामा करिता नाशिक येथे गेले होते. त्यानंतर दिनांक १२.०१.२०२४ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता माझा भाउ अकोला येथे परत आला होता. माझा भाउ संध्याकाळी घरी झोपला होता. दिनांक १३.०१.२०२४ रोजी सरताज शेख हा त्याची दुचाकी एक्टीव्हा वाहन घेवून सकाळी १०.३० वाजता माझ्या भावास घेण्यासाठी आला होता. माझा भाउ व सरताज शेख असे सोबत निघून गेले होते. त्यानंतर सरताज शेख हा सायंकाळी ५.३० वाजता आमच्या घरी आला व मला भेटला. सरताज शेख याने मला सांगितले की, हॉटेल सिटी प्राईडच्या मागे रेल्वे घासलेट गोडावूनच्या ठिकाणी आरोपी विजय उर्फ सोनू संगे याने माझ्या भावास कमरेच्या उजव्या बाजूस चाकू मारला आहे त्यामुळे तो जख्मी अवस्थेत तेथेच पडून आहे. त्यानंतर मी व माझा मित्र विजू लोंडे असे माझ्या दुचाकी वाहनाने घटनास्थळी गेलो. तेथे मी पाहिले की, माझा भाउ रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. माझा भाउ मृतावस्थेत होता. घटनास्थळी मी गेलो असतांना सरताज शेख तेथे आला व त्याने मला सांगितले की, सोनू संगेने माझ्या भावासोबत वाद घातला व त्यानंतर त्याच्या कमरेत, छातीवर व कानावर चाकूने मारुन त्याला ठार मारले.

४. मी घटनेचा जबानी रिपोर्ट रामदासपेठ पोलीस ठाण्यात दिला होता. मला आता रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी अ१/असा१** देण्यात येत आहे. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी अ२/असा१** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझी चौकशी करुन दोन वेळा माझा जबाब नोंदविला होता.

५. घटनेच्या दिवशी व वेळी माझ्या भावाने जे कपडे घातले होते ते मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. माझ्या भावाने पायात बूटं घातलेले होते. आता मला काळ्या रंगाची एक जीन्स पॅन्ट दाखविण्यात आली. ती माझ्या भावाचीच आहे. ती मी ओळखतो. तिला **मुद्देमाल वस्तू १** अशी खूण देण्यात येत आहे. आता मला काळ्या रंगाचा फुल बाहीचा एक शर्ट दाखविण्यात आला. तो माझ्या भावाचाच आहे. तो मी ओळखतो. त्यास **मुद्देमाल वस्तू २** अशी खूण देण्यात येत आहे.

<u>**उलटतपास आरोपीतर्फे वि.वि. श्री एम.बी.शर्मा यांच्यामार्फत**</u> –

६. हे म्हणणे खरे आहे की, मी जबानी रिपोर्ट देतांना तसेच पोलीसांना माझा जो आधी जबाब दिला त्यावेळी मी असे सांगितले नव्हते की, ''माझ्या भावाचे सन् २००८ मध्ये आरोपी व त्याचे दोन भाउ नामे शिव रेडी व प्रकाश रेड्डी यांच्या सोबत भांडण झाले होते. आरोपीने रुपये ५० साठी माझ्या भावासोबत भांडण करुन त्याचे डोक्यात मारले होते. त्यामुळे माझ्या वडीलांनी आरोपी व त्याचे भावां विरुध्द पोलीस स्टेशन सिव्हील लाईन येथे रिपोर्ट दिला होता. त्यानंतर आम्ही एकाच मोहल्ल्यात राहत असल्यामुळे सदर वाद मिटविला होता. त्यानंतर माझ्या भावा मध्ये व आरोपी मध्ये एकमेकांची कमी बोलचाल झाली होती''.

७. माझ्या भावाची व सरताज ची घटनेच्या पुर्वी पांच वर्षा आधीपासून मैत्री होती. माझ्या घरापासून घटनास्थळ हे १५ मिनिटांच्या अंतरावर आहे. घटनास्थळापासून पोलीस स्टेशन रामदासपेठ हे पांच मिनिटांच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, रेल्वे स्टेशन येथेही पोलीस चौकी आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी असे खोटे सांगत आहे की, सरताजने घरी येवून मला घटनेबाबत सांगितले तसेच घटनास्थळी देखील येवून त्याने माझ्या भावास आरोपीने मारल्याचे मला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सरताज यास घटनेबाबत काही माहिती नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा आमच्या घरामागेच राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी संशयावरुन आरोपी विरुध्द खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दोन महिन्यांनी सरताज याने फाशी घेवून आत्महत्या केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/–
(श्रीमती सुरेखा आर. गायकवाड)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला

दिनांक ११.०८.२०२६